# ट्रेडमार्क सावधगिरी सूचना

ज्याअर्थी कोल्हापुर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर गोकुळ प्रकल्प बी – 1, एम . आय.डी.सी., गोकुळ शिरगांव , ता.करवीर, जि.कोल्हापूर ही दि.16.03.1963 इ. रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 अन्वये नोंदणी झालेली सहकारी संस्था असुन संस्थेचा मुख्य उद्देश प्राथमिक दूध संस्थांकडून दूध संकलन करून त्यावर प्रक्रिया करून महाराष्ट्र व बाहेर दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करणे हा असुन कोल्हापुर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर हे दि.08.09.1988 इ. रोजी पासुन खालील ट्रेडमार्क चे एकमेव व अनन्य कायदेशिर मालक व प्रोप्रायटर आहेत त्याअर्थीः

सदर पत्रकाद्वारे तमाम जनतेला, विविध कारखानदार, व्यापारी, विक्रेते, वितरक तसेच तत्सम दुग्ध व्यवसायांना जाहीरपणे सुचित करणेत येत आहे की, आमचे उपरोक्त नमुद नोंदणीकृत ट्रेडमार्कचा व तद्अनुषंगिक अधिकारांचा गैरवापर करून काही बेईमान व्यक्ति अथवा व्यापारी ज्यांचेशी कोल्हापूर जिल्हा सह.दूध उत्पा. संघाचा अर्थात गोकुळ दूध संघाचा काही एक संबंध नसताना बेकायदेशिररीत्या संघाचे वर नमुद ट्रेडमार्कचा साधर्म्य गैरवापर करून व्यापार करून आर्थिक लाभ घेत असलेचे निदर्शनास आले आहे. तरी तमाम जनतेला आवाहान करण्यात येते की सदर व्यापाऱ्यांकडून अथवा विक्रेत्यांकडून आमचे कोणतेही उत्पादने खरेदी करताना संघाचे वर नमुद ट्रेडमार्कची खात्री करून घ्यावी.

तसेच, संघाचे ट्रेडमार्कचा गैरवापर तसेच उल्लंघन करणाऱ्या सर्व व्यापारी, व्यक्तींना या पत्रकाद्वारे सक्त सुचना देणेत येत आहेत की, जे कोणी संघाचे ट्रेडमार्कचा गैरवापर अथवा साम्य ट्रेडमार्कने उत्पादनांचा गैर वापर करीत असलेचे निदर्शनास आलेस त्याप्रसंगी संबंधित घटकांवर, व्यक्तींवर कायद्यातील उक्त तरतुदीअन्वये योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई केली जाईल व प्रसंगी होणाऱ्या परिणामांची जबाबदारी संबंधित व्यक्ती, व्यापारी अथवा घटकांवर राहील याची कृपया नोंद घ्यावी.

चेअरमन कार्यकारी संचालक

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर.